# पोलीस अधीक्षक कार्यालय,जळगांव.

फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११

**Email ID:-** sp.jalgaon@mahapolice.gov.in/ **pilcb.jalgaon@gmail.com**


= = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = =

**प्रेसनोट** दि.२९/०४/२०२६

## जळगाव जिल्हा पोलिसांची "ऑल आऊट मोहीम"

### जिल्ह्यातील ३६ पोलीस स्टेशन व ०३ वाहतुक शाखा यांची संयुक्त हद्दीत नाकाबंदी व "ऑल आऊट" ऑपरेशन; २५ लाखांहून अधिक मुद्देमाल जप्त, ४,१८,६२९/- रुपये दंड आकारण्यात येवून, १९५ आरोपीतावर कारवाई , १०१ गंभीर गुन्हे दाखल, ३४ हरविलेले बालक व महिला हस्तगत आणि अवैध धंद्यांवर धडक कारवाई.

===000===

**जळगाव:-** आगामी कायदा व सुव्यवस्था तसेच मालमत्तेच्या गुन्ह्यांच्या अनुषंगाने **मा.श्री.श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगाव** यांनी श्रीमती.कविता नेरकर, अपर पोलीस अधीक्षक चाळीसगांव व श्री.संदिप गावीत, जळगांव परिमंडळ यांच्या देखरेखीत संपूर्ण जिल्ह्यात दि.२८/०४/२०२६ रोजी सकाळी १०:०० ते २३:०० वाजेपर्यंत विशेष प्रतिबंधात्मक मोहीम राबविण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा (LCB) आणि सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी नाकाबंदी करून समाजकंटक व अवैध व्यवसायांवर खालील प्रमाणे प्रभावी कारवाई केली आहे :-

### १) मोहिमेचा संक्षिप्त सांख्यिकी तपशील (Statistical Summary)

| अ.क्र. | तपशील | कारवाईची संख्या / मुद्देमाल |
|---|---|---|
| १) | जप्त अवैध दारू (गावठी हातभट्टी व विदेशी) | १३६ केसेस , २५,१३,५४०/- रुपये किंमत |
| २) | जुगार कायद्यान्वये केलेली कारवाई | ५७ केसेस , ५७ आरोपी |
| ३) | शस्त्र नियंत्रण (आर्म ॲक्ट ४/२५) | ०२ केसेस (तलवार व चाकू जप्त) |
| ४) | अंमली पदार्थ प्रतिबंध (NDPS २७) | १५ केसेस |
| ५) | कोटपा (COTPA) - तंबाखूजन्य पदार्थ प्रतिबंध | २३३ केसेस ,(दंड - ३२,२२९/- रु.) |
| ६) | मुस्कान मोहीम(हरविलेले बालक व महिला शोध) | ३४ व्यक्ती शोधल्या (बालक व महिला) |
| ७) | बी.एन.एस.(BNS) कलम २८५ अन्वये कारवाई | २२ केसेस |
| ८) | मो.वा.का.(ड्रंक ॲंड ड्राईव्ह) (MV.Act. १८५) | २७२ केसेस , २,८२,३००/- रु. दंड |
| ९) | बुलेट सायलेन्सर व फॅन्सी नंबर प्लेट | १५० केसेस ,१,०४,१००/- रु. दंड |

### २) शस्त्र नियंत्रण आणि गंभीर गुन्हे (Arms Act & Serious

**दहशत माजविण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर शस्त्रे बाळगणाऱ्यांवर करण्यात आलेली कारवाई:**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | कारवाईचा प्रकार | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|---|
| १) | मुक्ताईनगर | आर्म ॲक्ट ४/२५ | २९.४ इंच तलवार (किंमत ५००/- रु.) |
| २) | जळगाव तालुका | आर्म ॲक्ट ४/२५ | ०२ धारदार चाकू |

## ३) दारुबंदी व जुगार कायद्यान्वये प्रभावी कारवाई :-

**जिल्ह्यातील अवैध हातभट्टी दारू अड्ड्यांवर धाडी टाकून मोठ्या प्रमाणात मुद्देमाल नष्ट करण्यात आला:-**

| अ.क्र. | पोलीस ठाणे (प्रमुख कारवाई) | केसेस | जप्त मुद्देमाल (रुपये) |
|---|---|---|---|
| १) | जळगाव तालुका | ०६ | ६,२४,५००/- |
| २) | भुसावळ तालुका | ०३ | १,८२,५००/- |
| ३) | यावल | १० | २,८५,५००/- |
| ४) | मुक्ताईनगर | ०६ | १,९८,०००/- |
| ५) | पिंपळगाव | ०८ | २,६८,५००/- |
| ६) | चोपडा ग्रामीण | ०६ | १,२३,४५०/- |
| ७) | सावदा | ०५ | १,१०,०००/- |
| ८) | पाचोरा | ०५ | १,०९,५००/- |
| ९) | **एकूण जिल्हा (३६ ठाणे)** | **१३६** | **२५,१३,५४०/-** |

## ४) भा.ना.सु.सं. (BNSS) अंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई :-

**नवीन कायद्यानुसार शांतता भंग करणाऱ्यांवर व संशयास्पद हालचाली करणाऱ्यांवर केलेली कारवाई :-**

| अ.क्र. | कलमाचा प्रकार | कारवाई संख्या |
|---|---|---|
| १) | **बी.एन.एस.एस. कलम १२६ (शांतता भंग)** | **१२२ इसम** |
| २) | **बी.एन.एस.एस. कलम १२९ (संशयास्पद हालचाली)** | **११ इसम** |
| ३) | **म.पो.का.कलम १४२ (तडीपार उल्लंघन)** | **१० केसेस** |
| ४) | **म.पो.का.कलम १२२/१२४** | **०६ केसेस** |

## ५) सामाजिक सुरक्षा आणि महिला सुरक्षा :-

| अ.क्र. | कलमाचा प्रकार | कारवाई संख्या |
|---|---|---|
| १) | **मुस्कान मोहीम** | हरविलेले बालक व महिला असे एकूण **३४** व्यक्तींचा शोध. |
| २) | **हॉटेल व लॉजेस तपासणी** | मानवी वाहतूक रोखण्यासाठी **१०५** हॉटेल/लॉजेस चेक केले. |
| ३) | **टवाळखोर विरोधी कारवाई** | शाळा/महाविद्यालय परिसरात **३३** टवाळखोरांवर कारवाई. |
| ४) | **सायबर रिल्स कारवाई** | आक्षेपार्ह रिल्स बनविणाऱ्या **०५** जणांवर गुन्हे दाखल. |

**समारोप:-**

सदर "ऑपरेशन ऑल आऊट" दरम्यान जिल्ह्यातील फरार व पाहिजे आरोपींची तपासणी करण्यात आली, ज्यामध्ये ७७ पैकी १३ आरोपी मिळून आले. जिल्ह्याभरात २१ ठिकाणी नाकाबंदी लावण्यात आली होती. यापुढेही अशाच प्रकारे अचानक नाकाबंदी व कॉम्बिंग ऑपरेशन राबवून गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व असामाजिक घटकांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा **पोलीस अधीक्षक श्री.श्रीकांत धिवरे** यांनी दिला आहे.

**( श्रीकांत धिवरे )**
**पोलीस अधीक्षक, जळगाव**

**प्रति,**

१/- मा. जिल्हा माहिती व जनसंपर्क अधिकारी, जळगाव.

२/- मा. संपादक/वृत्तसंपादक, सर्व वृत्तपत्रे व इलेक्ट्रॉनिक मीडिया (जनहितार्थ प्रसिद्धीसाठी).